# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग समिती

## सभावृत्तांत

## कार्यपत्रिका क्रमांक २

दिनांक: १३/०५/२०१५ वेळ: दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे मे २०१५ ची मासिक सभा बुधवार दिनांक १३/०५/२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील "राजमाता जिजाऊ सभागृह" येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/ सदस्या उपस्थित होते.

१. मा.सौ.काळभोर वैशाली जालिंदर - सभापती
२. मा. बाबर शारदा प्रकाश
३. मा. श्री.उल्हास शेट्टी
४. मा. सौ.सुभद्रा ईश्वर ठोंबरे
५. मा. भारती फरांदे
६. मा. आर.एस.कुमार
७. मा.नेटके सुमन राजेंद्र
८. मा. तरस बाळासाहेब जयवंत
९. मा. मोरेश्वर महादू भोंडवे
१०. मा.प्रसाद शेट्टी
११. मा.अविनाश (दादा) टेकवडे

याशिवाय श्री. चंद्रकांत खोसे -क्षेत्रीय अधिकारी, श्री. शेख फारुख, - कार्यकारी अभियंता स्थापत्य, श्री. मिलींद कपिले- कार्यकारी अभियंता विद्युत, लियाकत पिरजादे - कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा, श्रीम.रेखा गाडेकर - प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री.प्रदिप पुजारी-उपअभियंता झोनिपु स्थापत्य, श्रीम.झेड.मोमीन, - उपअभियंता पाणीपुरवठा, श्री.वैभव पुसाळकर-उपअभियंता उद्यान, श्री.सुनिल वाघुंडे, श्री.अनिल शिंदे - उपअभियंता स्थापत्य, श्रीम.लता बाबर - उपअभियंता विद्युत, श्री.पांडूरंग जाधव-लेखाधिकारी, श्री.के.डी.दरवडे-सहा. आरोग्याधिकारी, श्री.बेळगावकर एस.एस. कनिष्ठ अभियंता नगररचना, श्री.कुलकर्णी ए.ए.,श्री.बंडगर एस.बी., श्री.जन्नु आर.व्ही.-कनिष्ठ अभियंता जलनि:सारण, श्री.आर.एन.भाट – मुख्य अरोग्य निरीक्षक पशुवैद्यकीय विभाग

मा.सभापती यांनी उपस्थित सन्माननीय नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

मा.सभापती यांचे परवानगीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक १ मा.महापौर यांचेकडील पत्र दिनांक ११/०४/२०१५
मनपाचे सायन्स पार्कमधील होणाऱ्या तारांगणाचे नामकरण करणेबाबत.

विषय क्रमांक २ मा.सौ.सुमन राजेंद्र नेटके यांचा प्रस्ताव
प्रभाग क्रमांक १८ अ किवळे मध्ये महत्वाचे फोन नंबरचे, दिशादर्शक व नामदर्शक फलक लावणेबाबत.

विषय क्रमांक ३ मा.सौ.वैशाली जालिंदर काळभोर यांचा प्रस्ताव
प्रभाग क्रमांक २६ काळभोरनगर मधील विद्युत वाहिन्या भूमिगत करणे व D.P. Box बसविणेबाबत.

विषय क्रमांक ४ मा.सौ.वैशाली जालिंदर काळभोर यांचा प्रस्ताव
काळभोरनगर मधील व्यायामशाळेचे नामकरण करणेबाबत.

विषय क्रमांक ५ मा.सौ.वैशाली जालिंदर काळभोर यांचा प्रस्ताव
प्रभाग क्रमांक २६ काळभोरनगर मनपा शाळेच्या मैदानात खेळाच्या सुविधा/ साहित्य उपलब्ध करुन देणेबाबत.

विषय क्रमांक ६ मा. मोरेश्वर महादु भोंडवे यांचा प्रस्ताव
वाल्हेकरवाडी मधील चौकाचे नामकरण करणेबाबत.

**मा.श्री.प्रसाद शेट्टी :** माहे मार्च२०१५ चे मासिक सभेतील ठराव क्रमांक ७५ मध्ये “नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे” या ऐवजी नामकरण करणेबाबत. सदर विषयाचा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा” अशी दुरुस्ती करणेत यावी.

अ) दिनांक १३/०३/२०१५ रोजी घेणेत आलेल्या माहे मार्च २०१५ चे मासिक सभेचा सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्रमांक १२) मधील ठराव क्रमांक ७५ मध्ये “नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे” या ऐवजी नामकरण करणेबाबत. सदर विषयाचा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा” अशी दुरुस्ती करणेत आलेचे व दुरुस्तीसह सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक १०/४/२०१५ रोजी घेणेत आलेल्या माहे एप्रिल २०१५ चे सभेचा सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्रमांक १) कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ३ | विषय क्रमांक | : १ |
| दिनांक | : १३/०५/२०११५ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. प्रसाद शेट्टी | अनुमोदक | : अविनाश टेकवडे |

संदर्भ: मा. महापौर सौ.शकुंतलाताई भाऊसाहेब धराडे यांचे कडील पत्र क्रमांक महापौर/कावि/२८३/२०१५ दिनांक ३०/३/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने चिंचवड येथे उभारणेत आलेल्या सायन्स पार्कमध्ये होणार असलेल्या तारांगणास "कै. श्री.व्यंकटेश बापूजी केतकर" यांचे नाव देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ४ | विषय क्रमांक | : २ |
| दिनांक | : १३/०५/२०११५ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. सुमन राजेंद्र नेटके | अनुमोदक | : मा.बाळासाहेब जयवंत तरस |

संदर्भ: मा. सुमन राजेंद्र नेटके यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक १८ अ मधील किवळे, साईनगर, भिमाशंकरनगर, बापदेवनगर, सिध्दार्थनगर, दत्तनगर, विकासनगर, श्रीनगर, दांगटवस्ती, विस्डमशाळा, मनपा शाळा क्रमांक ९५, कोतवालनगर या भागामध्ये नामफलक व अग्निशामक दल, पोलीस स्टेशन, अॅम्ब्यूलन्स अशा विविध कार्यालयाचे महत्वाचे फोन नंबरचे फलक व दिशादर्शक फलक लावणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक : ५ विषय क्रमांक : ३
दिनांक : १३/०५/२०११५ विभाग : विद्युत
सुचक : मा. अविनाश टेकवडे अनुमोदक : मा.प्रसाद शेट्टी

संदर्भ: मा. सौ.वैशाली जालिंदर काळभोर यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक २६ काळभोरनगर मधील विद्युत वाहिन्या भूमिगत करुन योग्य त्या ठिकाणी डी.पी.बॉक्स बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक : ६ विषय क्रमांक : ४
दिनांक : १३/०५/२०११५ विभाग : स्थापत्य
सुचक : मा. अविनाश टेकवडे अनुमोदक : मा.प्रसाद शेट्टी

संदर्भ: मा. सौ.वैशाली जालिंदर काळभोर यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक २६ काळभोरनगर येथे नव्याने बांधण्यात आलेल्या जिमचे (व्यायामशाळेचे) "कै.कु.आकाश हनुमंत काळभोर व्यायमशाळा" असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक : ७ विषय क्रमांक : ५
दिनांक : १३/०५/२०११५ विभाग : क्रिडा
सुचक : मा. अविनाश टेकवडे अनुमोदक : मा.प्रसाद शेट्टी

संदर्भ: मा. सौ.वैशाली जालिंदर काळभोर यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक २६ काळभोरनगर येथील मनपाच्या कै.सोपानराव विष्णू काळभोर माध्यमिक विद्यालयाच्या मैदानात बास्केट बॉल रिंग, हॉलीबॉल नेट व खो-खो खेळाकरीता आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ८ | विषय क्रमांक | : ६ |
| दिनांक | : १३/०५/२०११५ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. मोरेश्वर महादू भोंडवे | अनुमोदक | : मा.बाळासाहेब जयवंत तरस |

संदर्भ: मा. मोरेश्वर महादू भोंडवे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक १९ वाल्हेकरवाडी मधील निसर्ग सोसायटी, सायली कॉम्प्लेक्स जवळ, सर्व्हे नं. १२३ समोरील चौकाचे " **निसर्गरत्न चौक**" असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-
(सौ.वैशाली जालिंदर काळभोर)
सभापती
अ प्रभाग समिती

अक्षेका /११/कावि/ १२० /२०१५
दिनांक : ०८ / ०६ /२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती